**महाराष्ट्र शासन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अकोला, जि. अकोला**

दुरध्वनी क्रमांक- ०७२४-२४३५०४७ ई-मेलः tah.akola@rediffmail.com

क्र.कक्ष./विविध/ना.तह./म.स./कावि- ६० /२०२३ दिनांक :- ०८/१२/२०२३

प्रति,

१ शिक्षणाधिकारी प्राथमीक जिल्हा परिषद, अकोला

२ शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद, अकोला

३ शिक्षणाधिकारी निरंतर, जिल्हा परिषद, अकोला

४ गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, अकोला

विषय :- दि. १८ डिसेंबर हा दिवस **अल्पसंख्याक हक्क दिवस** म्हणुन साजरा करण्याबाबत..

संदर्भ :- १. अल्पसंख्यांक विकास विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. अविवि-२०२३ प्र. क्र.-४२/का-८ दि. २९ नोव्हेंबर २०२३

२. मा. निवासी उपजिल्हाधिकारी अकोला यांचे पत्र क्रमांक कक्ष/अका./अल्पसंख्यांक/कावि-१५७/२०२३ दिनांक -०४/१२/२०२३ प्राप्त दिनांक - ०७/१२/२०२३

उपरोक्त संदर्भीय विषयांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यानी देखील १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून पाळण्याच्या सूचना संदर्भ क्र १ वरील परिपत्रकान्वये दिल्या आहेत. तसेच सदर दिवसाच्या निमित्ताने अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशिर हक्काबाबत जाणिव करून देणे या करीता दि. १४/१२/२०२३ ते २१/१२/२०२३ दरम्यान अल्प संख्यांक अधिकार सप्ताह राबवून त्या व्दारे विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत नमूद आहे. त्यानुसार सहपत्रीत केल्याप्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन केलेले आहेत. आपणास या व्दारे सूचीत करण्यात येते की, जिल्हा व तालुका स्तरावर खालीलप्रमाणे स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात.

१. इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी च्या विदयार्थ्यांकरीता भित्तीपत्र स्पर्धा आणि निबंध स्पर्धा

२. इयत्ता ११ वी ते पदवी पर्यंतच्या विदयार्थ्यांकरीता वक्तृत्व स्पर्धा आणि व्याख्यानमाला, चर्चासत्र, परिसंवाद इत्यादी चे आयोजन.

उपरोक्त प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरीता कार्यक्रमाचे व तपशिलवार माहिती या सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाबाबत संबंधीत सर्व शाळा/महाविदयालय यांना सुचना देण्यात याव्यात तसेच सदर कार्यक्रमाची कार्यवाही करण्यात यावी. त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहपत्र :- कार्यक्रमाचे नियोजन

तहसिलदार अकोला

प्रतिलीपी :- १ मा. मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद अकोला यांना माहिती करीता सविनय सादर.

२ मा. निवासी उपजिल्हाधिकारी अकोला यांना माहिती करीता सविनय सादर.

३ समन्वयक, महाराष्ट्र माइनॉरिटी एनजीओ फोरम, अकोला माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.

तहसिलदार अकोला

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अकोला जि. अकोला

दुरध्वनी कमांक 0724–2435047

क.कक्ष/विविध/ना.तह./म.स./कावि. 51 /2023 दिनांक : 08/12/2023

**कार्यकमाची रूपरेषा**

# "तुमच्या हक्काबददल जाणून घ्या"
# "Know About Your Rights"

अल्पसंख्याक हक्क दिवस निमित्ताने अल्पसंख्याक जागरूकता सप्ताह (14 ते 21 डिसेंबर 2023)

चे आयोजन करण्याबाबत

जिल्हयामध्ये आयोजित करण्यात येणारे कार्यकमाचा तपशिल –

अ)निबंध लेखन स्पर्धा ब).भितिपत्र स्पर्धा क).वक्तृत्व स्पर्धा

## अ. निबंध लेखन स्पर्धा

1. **गट – अ :**

   इयत्ता 8 वी ते 10 वी वर्गातील सर्व विद्यार्थी सहभाग घेउ शकतात

   स्पर्धेचा विषय – अल्पसंख्याक समुदायांची सामाजिक स्थिती

2. **गट – ब :**

   इयत्ता 11 वी आणि 12 वी वर्गातील सर्व विद्यार्थी सहभाग घेउ शकतात.

   स्पर्धेचा विषय – अल्पसंख्याक समुदाय परिचय आणि परिभाषा

3. **भाषाचे माध्यम –**

   हिंदी, मराठी, उर्दु आणि इंग्रजी

4. **मार्गदर्शक सुचना –**

   1. निबंध सुस्पष्ट व सुवाच्च हस्ताक्षरामध्ये लिहावे
   2. गट – अ चे निबंध 250 ते 300 शब्दांमध्ये असावा व गट ब चे निबंध 400 ते 500 शब्दांमध्ये असावा
   3. निबंधातील निबंध परिचय आणि मसुदा परिपूर्ण असावा
   4. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील
   5. तुमचा निबंध दिलेल्या शीर्षकाशी सुसंगत असायला पाहिजे
   6. अल्पसंख्याक शाळा/महाविदयालयातील आयोजित निबंध स्पर्धेच्या गट (अ) व (ब) मधील निबंधाचे संकलन करून आपल्या स्तरावर प्रथम व व्दितीय कमांक देण्यात निबंधाच्या मुळ प्रती व अहवाल दि 18–12–2023 रोजी साय 5 वा पर्यंत **अल्पसंख्याक विकास केंद(MDC), रोटी बॅक सेंटर, सागर, बेकरीजवळ, मोमीनपूरा, अकोला येथे सादर करावे.**

      **संपर्क व्यक्ती – डॉ जुबेर नदीम मो. 9881716686/9604776603**

7. **बक्षिसे** –

गट (अ) व (ब) मधुन पहिल्या 3 विजयी झालेल्या विदयार्थ्यांना आणि प्रत्येक तालुक्यासाठी एक प्रोत्साहन पारितोषिक हे जिल्हास्तरावर दि 27 डिसेंबर 2023 रोजी जिल्हा नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय अकोला येथे वितरीत करण्यात येईल.

## ब. भिंतिपत्र स्पर्धा

1. **गट अ :**

इयत्ता 5 वी ते 7 वी वर्गातील सर्व विद्यार्थी सहभाग घेउ शकतात
स्पर्धेचा विषय – अल्पसंख्याकांच्या हक्कांबददल लिहा आणि सजावट करा.

2. **गट ब :**

इयत्ता 8 वी ते 10 वी वर्गातील सर्व विद्यार्थी सहभाग घेउ शकतात
स्पर्धेचा विषय – देशाच्या विकासात असाधारण भूमिका बजावलेले अल्पसंख्यांक समाजातील लोक (या विषयांवर लिहा आणि सजावट करा)

3. **भाषाचे माध्यम** –

हिंदी, मराठी, उर्दू आणि इंग्रजी

4. **मार्गदर्शक सुचना** –

भिंतिपत्रकांसाठी सेंचुरीपेपरचा वापर करण्यात यावा
दोन सेंचुरीपेपरचा वापर करता येईल.

5. **जिल्हास्तरावरील अंतीम निवड पध्दती** –

जिल्हयातील प्रत्येक अल्पसंख्याक शाळेतील भिंतीपत्रक स्पर्धेचे आयोजन आपल्या शालेय स्तरावर दि 19/12/2023 रोजी करण्यात यावे. त्यानंतर गट (अ) व (ब) मधील प्रथम व व्दितीय कमांक विजयी विदयार्थी त्याचे मुळ भिंतीपत्रक व संबंधीत शिक्षक यांना जिल्हयातील अंतिम निवड फेरीसाठी दिनांक 21/12/2023 रोजी सकाळी 11.00 वा पर्यंत **सुफा इंग्लिश स्कूल, अकोट रोड, अकोला** येथे उपस्थित राहण्याबाबत सुचना दयाव्या.

सदर शालेय स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या भिंतीपत्रक स्पर्धेचा अहवाल दि. 20/12/2023 रोजी साय 5 वा पर्यंत **मोबाइल वाटसअप क.9422164266** (अय्युब खान सर) या वर सादर करण्यात यावा.

6. **बक्षिसे** –

गट (अ) व (ब) मधुन पहिल्या 3 विजय झालेल्या विदयार्थ्यांना आणि प्रत्येक तालुक्यासाठी एक प्रोत्साहन पारितोषिक हे जिल्हास्तरावर दि 27 डिसेंबर 2023 रोजी जिल्हा नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय अकोला येथे वितरीत करण्यात येईल.

## क. वक्तृत्व स्पर्धा

1. **गट – अ**

   वर्ग – 8 वी ते 10 वी वर्गातील सर्व विदयार्थी सहभाग घेउ शकतात

   स्पर्धेचे विषय – भारतीय संविधान,अल्पसंख्यांक हक्क आणि अंमलबजावणी

   **किंवा** भारतातील अल्पसंख्याक समुदाय आणि शिक्षण

2. **गट – ब**

   वर्ग 11 वी आणि 12 वी वर्गातील सर्व विदयार्थी सहभाग घेउ शकतात

   स्पर्धेचे विषय – भारतातील अल्पसंख्याक समुदायांच्या सामाजिक व शैक्षणिक स्थिती

   किंवा

   डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि अल्पसंख्याक चळवळ

3. **भाषाचे माध्यम –**

   हिंदी, मराठी, उर्दु आणि इंग्रजी

4. **मार्गदर्शक सुचना –**

   या वक्तुत्व स्पर्धेचे नियम व अट पुढील प्रमाणे असतील

   1. विद्यार्थ्यांना मराठी, हिदी, उर्दु व इंग्रजीमध्ये भाषण देता येईल.
   2. विद्यार्थ्यांना भाषणासाठी चार मिनिटे वेळ दिला जावा
   3. चेतावणीची घंटा 3 मिनिट 4 सेकंदांनी वाजली पाहिजे
   4. चार निमिटांनी अंतिम घंटा वाजवली जाईल
   5. चार निमिटानंतर प्रत्येक स्पर्धकांना 10 सेकंदांचा अतिरिक्त वेळ दिला जाईल.
   6. या वेळेमध्ये प्रत्येक स्पर्धकांना आपले भाषण संपवावे लागेल
   7. निरीक्षक (जज) यांचा निर्णय अंतिम असेल
   8. निश्चित केलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ घेणारा स्पर्धक यास स्पर्धेमध्ये सहभागी मानले जाणार नाही.

5. **शालेय स्तरावरील स्पर्धाचे आयोजन –**

   दिनांक 19 डिसेंबर 2023 रोजी महाविद्यालय/शालेय स्तरावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करावे व कार्यकमाची प्रसिध्दी देण्यात यावी.

   पहिल्या तीन(3) विजयी स्पर्धकांना महाविद्यालय/शालेय स्तरावर बक्षीस देण्यात यावे.

6. **जिल्हा स्तरावरील अंतीम निवड पध्दती –**

जिल्हयातील प्रत्येक अल्पसंख्याक शाळा / महाविदयालयातील आयोजित वक्तृत्व स्पर्धेच्या गट (अ) व (ब) मधील प्रथम कमांक विजयी विदयार्थ्यांचें नाव जिल्हयातील अंतिम निवड फेरीसाठी दिनांक 20–12–2022 रोजी साय 5.00 पर्यंत मोबाइल व्हाटसएप क **9764777595 (प्रा.जमीर खान पठाण)** यावर सादर करण्यात यावे.

- संबंधीत शिक्षक व प्रथम कमांक विजय झालेल्या विदयार्थ्यांनी अंतीम निवड फेरी स्पर्धेच्या ठिकाणी खालील निर्देशीत केलेल्या वेळ व दिनांकास उपस्थित रहावे.
- शाळा व महाविदयालय मध्ये आयोजित झालेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये विजय झालेल्या विदयार्थ्यांची अंतिम निवड फेरी दिनांक 21 डिसेंबर 2023 बुधवार रोजी आयोजित करण्यात येईल.
  **स्थळ – शाह बाबु उर्दु हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज, हमजा प्लॉट, अकोला**
  **वेळ** – सकाळी 11 वाजता

7. **बक्षिसे–**

गट (अ) व (ब) मधुन पहिल्या 3 विजय झालेल्या विदयार्थ्यांना आणि प्रत्येक तालुक्यासाठी एक प्रोत्साहन पारितोषिक हे जिल्हास्तरावर दि 27 डिसेंबर, 2023 रोजी जिल्हा नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय अकोयला येथे वितरीत करण्यात येईल.

*****************

**जिल्हास्तरीय अल्पसंख्याक हक्क दिवस समारोह तसेच जिल्हयात झालेल्या विविध स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना बक्षिस वितरण कार्यकमाचे आयोजन.**

दिनांक – 27 डिसेंबर 2023 (बुधवार)
वेळ – सकाळी 11 वाजता
स्थळ – जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला
सदर उपकमाबाबत अधिक माहितीसाठी खालील लिंकचा वापर करावा.

https://flyingcolours.orgin/notice_board. php

**अधिक माहितीसाठी संपर्क करा–**

1. डॉ. जुबेर नदीम **9881716686**
   (जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र माईनॉरिटी एनजीओ फोरम, अकोला)
2. प्रा. मोहम्मद रफीक **9822727254**
   (डायरेक्टर, महाराष्ट्र माईनॉरिटी एनजीओ फोरम, अकोला– महाराष्ट्र)